वादी तर्फे साक्षीदार क्र. –०१ नि.दि.दा.क्र. ९९/२०२२

शरद विरुध्द कृष्णा

मी शपथपूर्वक खरे सांगतो की निशाणी – १७

सरतपासणी शपथेवर सुरु द्वारे वकील श्री. पुडके यांच्या मार्फत

१०. मी सदर प्रकरणात माझे सरतपासाचे लेख दाखल केला असून त्यातील मजकूर माझे वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यातील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. तो निशाणी १७ वर आहे.

११. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०१ कडे तहसिलदार, कामठी यांनी दावा मिळकतीचे मुळ मालक रामचंद्र सदु केमेकर यांना दिलेल्या पट्टयाची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर तत्कालीन तहसिलदार यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २० देण्यात येते.

१२. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०२ कडे मी दावा मिळकत रामचंद्र सदु केमेकर यांच्या मुली अनुक्रमे शशीकला छत्रपती वांडे व श्रीमती वंदना राजू वांडे यांच्या कडून दावा मिळकत खरेदी केल्याबाबतच्या पंजीकृत खरेदी खताची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी, तसेच शशीकला व वंदना यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २१ देण्यात येते.

१३. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०३ कडे माझे नावे असलेली दावा मिळकतीच्या कराच्या पावतीची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २२ देण्यात येते.

१४. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०४ कडे सन २०१८–१९ च्या कर आकरणी प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २३ देण्यात येते.

१५. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०५ कडे दावा मिळकती मध्ये बांधकाम सुरु करण्यासाठी ग्राम पंचायत कोराडी यांचे कडे दिलेल्या अर्जाची पोच दाखल केली आहे. त्यावर ग्राम पंचायत कार्यालयाचा शिक्का व अधिकारी ची सही आहे. तसेच अर्जदार म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २४ देण्यात येते.

१६. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०६ कडे मी प्रतिवादीला माझ्या वकीलामार्फत पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २५ देण्यात येते.

१७. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०७ कडे प्रतिवादीला नोटीस

पाठविल्याबाबतच्या पोस्टाच्या पावतीची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

१८. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०८ कडे प्रतिवादी ला नोटीस मिळाल्याची पोस्टाची पोच पावतीची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येते.

१९. मी कागदयादी निशाणी १९ अनुक्रमांक ०९ कडे प्रतिवादीने माझे वकीलांना पाठविलेल्या उत्तराची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते.

२०. मी कागदयादी निशाणी १३ अनुक्रमांक ०१ व ०२ कडे दावा मिळकतीचे दोन छायाचीत्र दाखल केली आहेत. त्यांना **आर्टिकल–अ व ब अनुक्रमे** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

स्वाक्षरी/–

कामठी
दिनांक ०२/११/२०२३

(अमित अ. कुळकर्णी)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी